

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

********************************************************

**सूचना** दि. 16 / 09 / 2019

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - III च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, मंगळवार दिनांक 17/09/2019 रोजी पेपर क्रमांक – VIII "अमेरिकेचा इतिहास " या विषयाच्या प्रकरण-1 (अमेरिकन राज्यक्रांती) वरील ओपनबुक टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला इतिहास विभागामध्ये रूम नंबर 24 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

डॉ. एस. आर. कट्टीमनी

इतिहास विभाग



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

****************************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 17 / 09 / 2019

बी. ए. भाग - III

सेमिस्टर - IV पेपर क्रमांक – VIII

विषय - "अमेरिकेचा इतिहास"

प्रकरण-1 अमेरिकन राज्यक्रांती

ओपनबुक टेस्ट वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - अमेरिकेच्या 13 वसाहतीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा . (गुण-10)

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. 17/9/2019

---

वर्ग - बी.ए.- III सेमिस्टर - IV

पेपर क्र - VIII टेस्ट - ओपनबुक टेस्ट

प्रकरणाचे नाव - अमेरिकेचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 5657 | 8 | 10 | | |
| 2 | 5689 | 9 | 11 | | |
| 3 | 5629 | 9 | 12 | | |
| 4 | 5655 | 8 | 13 | | |
| 5 | 5687 | 9 | 14 | | |
| 6 | 5652 | 8 | 15 | | |
| 7 | 5628 | 9 | 16 | | |
| 8 | 5643 | 9 | 17 | | |
| 9 | | | 18 | | |

विषय शिक्षक स्वाक्षरी

137

8/10

Date 17 | 9 | 19

नाव : माने प्रथमेश अरुण · Roll no.- 5657
पेपर : अमेरिकेच्या इतिहास ·

प्रश्न अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती लिहा ·

- अमेरिकेतील ब्रिटिशांच्या वसाहती · पुढीलप्रमाणे,

1) व्हर्जिनिया 2) मॅसॅच्युपटस् 13) जॉर्जिया ·
3) मेरीलंड 9) न्यु हॅम्पशायर
4) न्यूयॉर्क 5) पेनिसिल्व्हानिया
4) डिलावेअर 10) ऱ्होड आयलंड
5) कनेक्टीकट 11) दक्षिण कॅरोलिना
6) न्युजर्सी 12) उत्तर कॅरोलिना

वसाहतींची माहिती पुढीलप्रमाणे :-

1) व्हर्जिनिया :- व्हर्जिनिया या व्यापारी कंपनीला इ.स. १६०६ मध्ये अमेरिकेत ३४° ते ४१° उत्तर अक्षांपर्यंतच्या भूभागात वसाहत स्थापन करण्याची रीतसर सनद देण्यात आली होती. स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी विवाह संबंध प्रस्थापित करून ही वसाहत टिकून राहिली. या वसाहतीचे हवामान तंबाखूच्या उत्पादनास अनुकूल होते. या वसाहतीत प्रचंड प्रमाणात तंबाखू पिकून त्याची विक्री इंग्लंड व युरोपियन देशांत मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. १६१९ मध्ये तंबाखूच्या मळ्यात काम करण्यासाठी द. आफ्रिकेमधून २० निग्रो आणले गेले.

2) मॅसॅच्युपटस् :- काही प्युरीटन्सनी 'मॅसॅच्युसेट्स कंपनीची स्थापना केली. व ते १६३० मध्ये अमेरिकेत दाखल झाले. त्यातील जॉन विन्थ्राप या कर्तबगार कंपनी संचालकाने खाडी व नद्यांच्या प्रदेशात या वसाहतींचा विकास केला. या वसाहतीत २० हजार इंग्रज स्थायिक झाले. तेथील परिस्थितीचा यथायोग्य फायदा त्यांनी घेतला. व्यापाराबरोबर येथे जहाज बांधणी, लाकूड सामान इ. व्यवसायही वाढले. १६३६ मध्ये या ठिकाणी जगप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापीठ स्थापन केले.

3) मेरीलँड :- इ.स. १६३२ मध्ये चेसपीक व डेलावेअरच्या आखातांच्या मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टी मोर याने मेरीलँड या वसाहतीची स्थापना केली. कॅथॉलिक पंथाची वेगळी वसाहत म्हणून स्थापना. या वसाहतीमध्ये तंबाखूचे पीक घेतले जाई.

138

४) न्यूयॉर्क: हॉलंडमधील डच खलाशी हडसनने मॅनहॅटन व लॉंगन बेटाचा व हडसन नदीचा १६०८ मध्ये शोध लावला. इंग्रजांनी १६६४ मध्ये ॲमस्टरडॅमवर स्वारी करून डचांची ही वसाहत जिंकून घेतली व त्यास न्यूयॉर्क हे नाव दिले. येथे विविध धर्मा-च्या पंथांचे लोक स्थायिक झाले. शेती व पशुपालन यांचा विकास झाला. समुद्रकिनारा जवळ असल्याने व्यापार वाढला.

५) डिलावेअर :- स्वीडीश व्यापाऱ्यांनी १६४० मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली व त्यास न्यू स्वीडन हे नाव दिले. इंग्रजांनी डचांचा पराभव करून तेथे आपले वर्चस्व मिळवले. इंग्रजांनी या वसाहतींचे नाव बदलून डिलावेअर ठेवले.

६) कनेक्टिकट :- इंग्लंडमधील प्युरीटांनी स्थापन केलेल्या वसाहतींपैकी एक. इंग्लंडच्या राजाची सनद मिळाली नंतर १६६२ मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली. येथे लोकशाही प्रशासन व्यवस्था. येथे fundamental orders of Connecticut नावाची स्वतंत्र घटना तयार करून प्रातिनिधिक विधिमंडळाची निर्मिती केली.

७) न्यूजर्सी :- डच लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती. इ.स. १६६४ मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली. येथे ही लोकशाही शासनप्रणाली होती. येथील विधिमंडळाने 'स्वतंत्र नागरिकांचे कायदे' पास करून लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न केला होता. कोलंबिया विद्यापीठ ही या वसाहतीतच होते.

८) न्यू हॅम्पशायर :- न्यू इंग्लंड संघातील सहा वसाहतींपैकी न्यू हॅम्पशायर ही एक वसाहत आहे. १६७९ मध्ये न्यू इंग्लंड संघाच्या निर्मिती करण्यानंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. ही वसाहत अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील उत्तर टोकास होती. या वसाहतीवर मॅसॅच्युसेट्स च्या प्रभाव होता.

९) पेनसिल्व्हानिया :- दुसऱ्या चार्ल्सने विल्यम पेनला या प्रांताची वैयक्तिक सनद दिली होती. तो क्वेकर पंथीय होता. त्याने १६८२ मध्ये ही वसाहत स्थापन केली. स्कॉटलंडमधील लोक मोठ्या प्रमाणावर येथे येऊन स्थायिक झाले. कापड, फर्निचर, चामड्याच्या उद्योग इ. विकसित झाले होते. अमेरिकेच्या आर्थिक विकासात या वसाहतीला विशेष महत्त्व. फिलाडेल्फिया शहर याच वसाहतीत.

ROYAL

१०) -होड आयलंड :- न्यू इंग्लंड राज्यसंघात या वसाहतीचा सुरुवातीला सामावेश होता. १६८४ मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला. रॉजर विल्यम हा बंडखोर धर्मसुधारक मॅसॅच्युसेट्स मध्ये होता. त्याच्या पुरोगामी विचारांमुळे हद्दपार व्हावे लागले. म्हणून तो होड आयलंड वसाहतीत आला. या ठिकाणी त्याने धार्मिक स्वायत्तता, स्वातंत्र्य, समता व लोकशाही रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या ठिकाणी नवसमाजाची निर्मिती झाली.

११) दक्षिण कॅरोलिना :- इ.स. १६७० मध्ये दुसऱ्या चार्ल्स ने लॉर्ड्स शॅफ्टस आणि इतर आठ व्यक्तींना दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावर ३१° ते ३६° अक्षांशामधील जागा मालकी हक्काने दिली. त्या ठिकाणी दक्षिण कॅरोलिना ही वसाहत निर्माण झाली. येथील सुपीक जमिनीमुळे शेतीचा विकास येथे झाला. भात व तंबाखूचे येथे मोठ्या प्रमाणात उत्पन्न निघत होते. चार्लस्टन या बंदरामुळे व्यापार भरभराटीला आला होता. मात्र येथे गुलामगिरीची अनिष्ट प्रथा होती.

१२) उत्तर कॅरोलिना :- व्हर्जिनियाला लागूनच ही वसाहत होती. १७२९ मध्ये ही वसाहत वेगळी झाली. जमीनदारीची प्रथा होती. व हे जमीनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन जगणारे होते. त्यामुळे तेथे गुलामगिरीची प्रथा होती. येथील सांस्कृतिक, आर्थिक आणि लोकशाहीचा देखील विकास झाला नव्हता. त्यामुळे भूदास कामगार व सामान्य जनता ही दुर्लक्षित राहिली होती.

१३) जॉर्जिया : जोस प्डवर्ड ओगलथार्पने गरीब, कर्ज बाजारी व मागासलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने १७३२ मध्ये ही वसाहत सॅव्हाना नदीच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर वसवली होती. राजा जॉर्जच्या स्मरणार्थ यास जॉर्जिया नाव देण्यात आले होते. या वसाहतीत सॅव्हाना शहर विकास पावले होते.

ऐतिहासिक मूल्यमापन :- अशा रीतीने उत्तर अमेरिका खंडात एकूण १३ वसाहती स्थापन करण्यात इंग्लंडला यश आले. पहिल्या वसाहतीची स्थापना १६०७ मध्ये झाली तर तेरावी शेवटची वसाहत जॉर्जिया ही १७३२ मध्ये स्थापन झाली. अमेरिका [United States of America] या देशाची प्रारंभिक उभारणी या १३ वसाहतीमुळेच झाली. या तेरापैकी काही वसाहती खाजगी कंपन्या, काही

वसाहती एखादया व्यक्तीच्या पुढाकाराने काही सांघिक प्रयत्नाने व काही इंग्लंडच्या राजसत्तेने स्थापन केल्या होत्या, कालांतराने या वसाहतींची खाजगी व सांघिक मालकी जाऊन सर्वच वसाहतींवर इंग्लंडचे वर्चस्व निर्माण झाले.

9/10

Roll No. 5689

GoodLuck Page No.
Date 17 | 9 | 2019

प्र २] अमेरिकेच्या १३ वसाहतींची माहिती लिहा ?

→ १] ब्रिटिशांची पहिली वसाहत व्हर्जिनिया :-

१५८४ साली वॉल्टर रॅलेचा अमेरिल वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला तरी त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले व हे काम फुटक्या - तुकड्याचे नाही याची जाणीव झाली. त्यानंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांनी हे काम सामुदायिकरित्या व राज्यकर्त्यांच्या पाठिंब्याने करण्याचे ठरविले. त्यांनी 'लंडन' व 'प्लीमाऊथ' कंपनी अशा दोन कंपन्या स्थापन केल्या. या कंपन्यांनी पहिला जेम्स याच्याकडून उत्तर अमेरिकेत ३४ ते ४० रेखांशामधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद १६०६ साली मिळविली. कॅप्टन न्यूपोर्ट या धाडसी खलाशाच्या नेतृत्वाखाली 'सुसन कान्स्टन्ट', 'गॉडस्पीड' व 'डिस्कव्हरी' या तीन नौका घेऊन १०५ ब्रिटिश लोक अमेरिकेत वसाहत करण्यासाठी निघाले. १६०७ मध्ये हे लोक चेसपीक या आखातात घेऊन जिवणाच्या एक नदीच्या मुखाशी वसाहत करून राहिले. त्यांनी या जागेला आपल्या राजाच्या सन्मानार्थ 'जेम्स टाऊन' असे नाव दिले. ही वसाहत व्हर्जिनिया या नावानेच ओळखली जाते. ही वसाहत करताना या लोकांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. रोगराई, अन्नाचा तुटवडा, तेथील जमातीच्या लोकांचे हल्ले यामुळे अनेकजण मृत्युमुखी पडले १०५ पैकी केवळ ५३ लोकच जिवंत राहिले. त्यांचीही स्थिती भयानक होती. पण याच काळात इंग्लंडहून काही मदत आली

२] मॅसॅच्युसेट्स :-

चार्ल्स पहिला याच्या कारकिर्दीत प्युरिटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा बराच त्रास झाला होता. त्यापैकी १०२ प्युरिटन 'मे फ्लॉवर' जहाज घेऊन १६२० मध्ये अमेरिकेतील 'केपकॉड' बंदरापाशी येवून पोहोचले. त्यांनी राजाकडून वसाहत स्थापण्याची सनद घेतली नव्हती, अमेरिकन भूमीवर त्यांचा हक्क नव्हता तेव्हा त्यांनी आपापसात विचारविनिमय करून नवीन वसाहतील शासनयंत्रणा स्थापन करण्याचा करार केला. हा करार 'मे फ्लॉवर कॉम्पॅक्ट' या नावाने प्रसिद्ध आहे. केपकॉड प्रदेशालाच पुढे 'प्लायमाऊथ' हे नाव रूढ आले. धर्मछळाला कंटाळलेले हजारो लोक प्लायमाऊथ येथे येऊन स्थायिक झाले या ठिकाणी लोकांना खरे स्वातंत्र्य मिळाले; लोकशाहीचा पाया या वसाहतीत घातला गेला पुढे १६३० मध्ये प्लायमाऊथ

GoodLuck Page No.
Date

मॅसॅच्युसेटस ' मध्ये विलीन झाली.

दुसऱ्या काही प्युरीटन्सनी 'मॅसॅच्युसेटस बे कंपनी'ची स्थापना केली व ते 1630 मध्ये अमेरिकेत दाखल झाले त्यातील जॉन विन्थ्राप या कर्तबगार कंपनी संचालकाने नद्यांच्या खाडीच्या प्रदेशात मॅसॅच्युसेटस या वसाहतीचा विकास केला.

३] मेरीलँड :-

इ.स 1632 मध्ये चेसपीक व डेलावेअर आखाताच्या मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टीमोर (जॉर्ज कल्व्हर्ट) याने 'मेरीलँड' या वसाहतीची स्थापना केली. पहिल्या चार्ल्सने ही वसाहत स्थापण्याबद्दल सनद दिली होती म्हणून त्याच्या राणीच्या हेनरिएटा मेरी तिच्या नावाने ही वसाहत सुरु करण्यात आली, व्यापाराकरिता आलेल्या लोकांव्यतिरिक्त कॅथॉलिक पंथाच्या लोकांनाही या वसाहतीत स्थान होता आले, बाल्टीमोर हा या वसाहतीचा राज्यपाल होता व पुढे त्याच्याच घराण्याची सत्ता या वसाहतीवर राहिली. 1635 मध्ये या वसाहतीत प्रातिनिधिक विधिमंडळाची स्थापना केली. मध्य अमेरिकेतील या वसाहतीत व्यापार, उद्योग व शिक्षण इत्यादी क्षेत्रांत अन्य वसाहतीप्रमाणे विकास होऊ शकला नाही.

४] न्यूयॉर्क :-

हॉलंडमधील डच खलाशी हडसनने मॅनहॅटन बेटाचा व हडसन नदीचा 1609 मध्ये शोध लावला. नंतर डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला. 1626 मध्ये पिटर मायन्युटने (ॲमस्टरडॅम) शहर वसविले. परंतु डचांना या वसाहतीवर फार काळ वर्चस्व टिकविता आले नाही. इंग्रजांनी 1664 मध्ये ॲमस्टरडॅमवर स्वारी करून ही वसाहत जिंकली व त्या शहरास व वसाहतीस न्यूयॉर्क हे नाव दिले. ही वसाहत डचांच्या ताब्यातून गेली तरी तेथे त्यांच्या जीवनपद्धतीचाच प्रभाव राहिला होता. या वसाहतीत विविध पंथांचे - धर्मांचे लोक स्थायिक झाले होते त्यामुळे या वसाहतीत विविधता आढळते या वसाहतीत शेती व्यवसाय पशुपालन यांचा विकास झाला. समुद्रकिनारा जवळ असल्याने व्यापार वाढला. न्यूयॉर्क लोकरीच्या व्यापाराचे केंद्र बनले होते. पुढील काळात येथे शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती झाली.

ROYAL

5) डिलावेअर :-

स्वीडिश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली व त्या वसाहतीला 'न्यू स्वीडन' हे नाव देण्यात आले. पुढे त्या वसाहतीचा ताबा डचांनी घेतला. इंग्लंडच्या राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती, तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव करून तेथे आपले वर्चस्व मिळविले. इंग्रजांनी त्या वसाहतीचे 'न्यू स्वीडन' हे नाव बदलून डिलावेअर हे नाव दिले दुसऱ्या चार्ल्सने डिलावेअर वसाहत पेनसिल्व्हानियात विलीन केली होती; पुढे ती 1776 मध्ये स्वतंत्र झाली.

6) कनेक्टीकट :-

इंग्लंडमधील प्युरीटनांनी अमेरिकेत 'न्यू इंग्लंड' राज्यसंघात ज्या प्लीमाऊथ, मॅसॅच्युसेट्स, न्यू हॅम्पशायर, ऱ्होड आयलंड, कनेक्टीकट व न्यू हेवन या सहा वसाहती स्थापन केल्या होत्या त्यापैकीच कनेक्टीकट ही एक होती. इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर 1662 मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली. या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती येथे येथे Fundamental orders of Connecticut नावाची स्वतंत्र घटना तयार करून प्रातिनिधिक विधिमंडळाची निर्मिती केली होती. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात या वसाहतीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

7] न्युजर्सी :-

डच लोकांनी न्युजर्सी वसाहत स्थापन केली होती इ.स 1664 मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली. येथेही लोकशाही शासनप्रणाली होती येथील विधिमंडळाने 'स्वतंत्र नागरिकांचे कायदे.' पास करून लोकशाही सक्षम करण्याचा प्रयत्न केला होता. चेसपीक व डेलावेअर आखाताच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली, कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

8) न्यू हॅम्पशायर :-

न्यू इंग्लंड संघातील सहा वसाहतींपैकी न्यू हॅम्पशायर ही एक वसाहत आहे. 1679 मध्ये न्यूइंग्लंड संघाच्या विभक्तीकरणानंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. ही वसाहत अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील उत्तरेच्या टोकास होती व वसाहतीवर मॅसॅच्युसेट्सच्या प्रभाव होता

GoodLuck | Page No. | Date

9) पेनसिल्व्हानिया :-

दुसऱ्या चार्ल्सने विल्यम पेनला या प्रांताची वैयक्तिक सनद दिली होती, तो क्वेकर पंथीय होता त्याने 1682 मध्ये ही वसाहत स्थापन केली. पेन हा धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता व गुलामगिरी पद्धतीचा विरोधक होता स्कॉटलंड येथील लोक मोठ्या प्रमाणात येथे येऊन स्थायिक झाले होते. स्कॉटलंड व जर्मन लोकांच्या उद्योगी व कष्टाळू प्रवृत्तीमुळे या वसाहतीच्या चांगलाच विकास झाला होता

10) ऱ्होड आयलंड :-

'न्यू इंग्लंड' राज्यसंघात या वसाहतीचा सुरुवातीला समावेश होता 1685 मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला रॉजर विल्यम हा कट्टर धर्मसुधारक मॅसेच्युसेटमध्ये होता. त्याच्या पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो ऱ्होड आयलंड वसाहतीत आला ठिकाणी त्याने धार्मिक स्वातंत्र्य, स्वातंत्र्य, समता व लोकशाही रुजविण्याच्या प्रयत्न केला त्यामुळे या ठिकाणी समाजाची निर्मिती केली व त्याची स्वातंत्र्य आंदोलनासाठी मदत झाली.

11) दक्षिण कॅरोलिना :-

इंग्लंडचे राष्ट्रीय धोरण स्पेनला शह देण्याचे होते इ.स 1670 मध्ये दुसऱ्या चार्ल्सने लॉर्ड्स ब्रॉफ्टमबर आणि इतर आठ व्यक्तींना दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्याचा उत्तर 36° अक्षांशामधील जागा मालकी हक्काने विकली होती त्या ठिकाणी दक्षिण कॅरोलिना ही वसाहत निर्माण झाली येथील जमीन सुपीक होती त्यामुळे शेती व व्यापाराचा येथे विकास झाला. भात व तंबाखूचे येथे मोठ्या प्रमाणात उत्पन्न निघत होते. चार्ल्सटन या बंदरामुळे व्यापार भरभराटीला आला होता मात्र येथे गुलामगिरीची अनिष्ट प्रथा होती राजकारण व समाजकारणावर येथील जमीनदारांचा प्रभाव होता दक्षिणेकडील वसाहतीत दक्षिण कॅरोलिना आघाडीवर होते.

12) उत्तर कॅरोलिना :-

व्हर्जिनियाला लागूनच ही वसाहत होती. सुरुवातीला ही व्हर्जिनिया वसाहतीचाच अंतर्भूत होती. परंतु 1729 मध्ये ती वेगळी झाली, इतेथे जमीनदारीची प्रथा होती व हे जमीनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन

9/10

GoodLuck Page No.
Date १५ । ९ । १९

Name : Swagat Sambhaji Chougale
Class : B.A. III
Roll No : 5629
Sub : History peper No. 8

# अमेरिकेचा इतिहास.

प्रश्न अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती लिहा.

→ प्रस्तावना :

अमेरिकेत वसाहत करण्याच्या दृष्टीने पहिल्यांदा मार्च 1584 मध्ये वॉल्टर रॅलेने एलिझाबेथ राणीकडून सनद मिळवून फिलीप ॲमडास व आर्थर वार्लो यां दोघांनी उत्तर अमेरिकेत वसाहतीसाठी जागा शोधण्यासाठी पाठविले ते 67 दिवसांनंतर उत्तर कॅरोलिनाच्या तटाजवळील रोनोक बेटात गेले. रॅलेने राणीच्या सन्मानार्थ या भागाला 'व्हर्जीनीया' नाव दिले होते. परंतु ही वसाहत फार काळ टिकू शकली नाही.

अमेरिकेच्या 13 वसाहती पुढीलप्रमाणे :

① ब्रिटिशांची पहीली वसाहत व्हर्जिनिया :

1584 साली वॉल्टर रॅलेचा अमेरिकेत वसाहत निर्माण करण्याचा पहीला प्रयत्न अयशस्वी झाला. तरी त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले. व हे काम एकट्या दुकट्याचे नाही याची जाणीव झाली. ब्रिटिश व्यापाऱ्यांनी 'लंडन व प्लीमाउथ' कंपन्या स्थापन केल्या या कंपन्यांनी पहीला जेम्स यांच्या कडून उत्तर अमेरीकेत 34 ते 40 रेषांमधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद 1606 साली मिळवली 'व्हर्जिनीया' ही वसाहत करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले 'जॉन रॉल्फ' या इंग्रजाने पोको होंटास या नाम जातीच्या प्रमुखाच्या मुलीशी लग्न केले. व त्यांच्याशी मैत्री केली. त्यांच्याकडून तंबाखुच्या लागवडीचे तंत्र अवगत करून घेतले. वृक्षतोड करून जमिनी लागवडीखाली आणल्या त्याच्या भरमसाठ निर्यातीमुळे वसाहतकारांना फायदा झाला व त्यांची भरभराट होण्यास मदत झाली.

२) मॅसॅच्युसेट्स :

चार्ल्स पहील्या याच्या कारकिर्दीत प्युरीटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा बराच त्रास झाला होता. त्यापैकी 302 प्युरीटीन जहाज घेवून 1680 मध्ये अमेरिकेतील बंदराजवळ येऊन पोहचले. त्यांनी राजाकडुन सनद घेतली नव्हती त्यामुळे त्यांचा अमेरीकन भुमीवर हक्क नव्हता. दुसऱ्या काही प्युरीटन्सनी मॅसॅच्युसेटस कंपनी स्थापन केली. त्याचा त्यांनी विकास केला. या वसाहतीत २० हजार इंग्रज स्थायिक झाले. व्यापाराबरोबर येथे जहाजबांधणी, लाकुड सामान इ. व्यवसाय ही वाढले. काही अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

३) मेरीलँड :

इ.स. 1632 मध्ये चेसपिक व डेलावेर आखाताच्या मधल्या भू-भागापासुन लॉर्ड बाल्टीमोर याने मेरीलँड या वसाहतीची स्थापना केली. ही वसाहत स्थापन्याबाबत सनद दिली होती. म्हणुन तिच्या राणीच्या गौर वार्थ तिच्या नावाने ही वसाहत सुरु करण्यात आली. 1635 मध्ये येथे वसाहतीत प्रातिनिधिक विधीमंडळाची स्थापना केली. या वसाहतीत व्यापार उद्योग व, निरिक्षण अन्य वसाहतीप्रमाणे विकास होउ लागला.

४) न्युयॉर्क :

हॉलंड मधील डच खलाशी ह्युसनने मॅनहॅटन व लॉग्रन बेटाचा व हडसन नदिचा 1609 मध्ये शोध लावला. त्यानंतर डचांनी त्याठीकाणी वसाहतीस प्रारंभ केला. इंग्रजांनी 1664 मध्ये 'ॲमस्टरडॅमवर' स्वारी करुन ही वसाहत जिंकली व त्यास वसाहतीस 'न्युयॉर्क' हे नाव दिले. या वसाहतीत विविध पंथांचे धर्माचे लोक स्थायिक झाले होते. त्यामुळे वसाहतीत विविधता आढळते. वसाहतीत शेती, व्यवसाय, पशुपालन यांचा विकास झाला.

५) डिलावेअर :

स्वीडीश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डिलोवेअर नदिच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली

व त्या वसाहतींना न्यु स्वीडन हे नाव दिले. इंग्लंडला राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती. तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव करून आपले वर्चस्व मिळवले. वसाहतींचे 'न्यु स्वीडन हे नाव बदलुन डिलोवेर' हे नाव दिले.

6) कनेक्टीक :

इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर 1662 मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली. या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती. येथे Fundamental orders of connecticut नावाची स्वतंत्र घटना स्थापन प्रातिनिधिक विधीमंडळाची निर्मिती केली होती. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात या वसाहतीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

7) न्यूजर्सी :

डच लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती. इ.स 1664 मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली. येथेही लोकशाही शासन प्रणाली होती. अमेरिकन विधीमंडळाने स्वतंत्र नागरिकांचे कायदे केले. लोकशाही भक्कम करण्याचा प्रयत्न केला. चेसपिक व डेलावेअर आखातच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली. कोलंबीया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

8) न्यु हॅम्पशायर :

न्यु इंग्लंड संघातील सहा वसाहतीं पैकी न्यु हॅम्पशायर ही एक वसाहत आहे. 1679 मध्ये न्यु इंग्लंड संघाच्या विभक्ती करनानंतर या वसाहतीवर मॅचेसुटचा प्रभाव होता.

9) पेनसिल्व्हानिया :

दुसरा चार्ल्स विल्यम पेन याने 1682 मध्ये ही वसाहत स्थापन केली. स्कॉटलंड व जर्मनी लोकांच्या उद्योगी व काटकाटू प्रवृत्तीमुळे वसाहतीचा चांगलाच विकास झाला होता. अमेरिकेच्या आर्थिक विकासात या वसाहतीला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

10) ऱ्होड आयलंड :

1685 मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला. 'रॉजर विल्यम हा बंडखोर धर्मसुधारक होता. पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले. म्हणून तो ऱ्होड आयलंड वसाहतीत आला या ठिकाणी नवसमाजाची निर्मिती झाली.

11) दक्षिण कॅरोलीना

व्हर्जीनीयाला लागून ही वसाहत होती. त्या ठीकाणी ही वसाहत स्थापन करण्यात आली. तेथील जमिन सुपिक होती. शेती व व्यापाराचा तिथे विकास झाला होता.

12) उत्तर कॅरोलीना :

'व्हर्जीयानीला लागून ही वसाहत होती. तेथे जमिनदारीची प्रथा होती. व हे जमिनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन जगणारे होते. त्यामुळे तिथे गुलामगीरीची प्रथा होती. तेथे सांस्कृतिक आर्थिक विकास व्हायला तसा झाला नाही. सामान्य जनता कामगार दुर्लक्षित राहीली होती.

13) जॉर्जिया

जेम्स एडवर्ड ओगलथार्पने गरीब कर्जबाजारी मागासलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने 1732 मध्ये ही वसाहत सॅव्हाना नदिच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीवर जमिनिवर वसवली होती राजा जॉर्जच्या स्मरणार्थ या वसाहतीस जॉर्जिया असे नाव देण्यात आले. या वसाहतीच्या दक्षिणेला असलेला फ्लोरीडाचा प्रदेश स्पॅनिशांच्या ताब्यात होता. त्यांच्या वर्चस्वाला आळा घालण्यासाठी इंग्रजांचे या वसाहतीकडे लक्ष होते.

9/10

classmate
Date 14-8-19
Page

नेहा शिवाजी कोंढाडे
विवेकानंद कॉलेज
बी. ए. भाग -3
रोल नं 5655

प्र

# अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती

## 1) व्हर्जिनिया

1584 साली वाल्टर रॅलेचा अमेरिकेत वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला तरी त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले व हे काम एकट्या-दुकट्याने नाही याची जाणीव झाली. त्यानंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांनी हे काम सामुदायिकरित्या व राजकर्त्यांच्या पाठिंब्यासाठी करण्याचे ठरविले. त्यांनी 'लंडन' व 'प्लीमाऊथ' कंपनी अशा दोन कंपन्या स्थापन केल्या या कंपन्यांनी पहिला जेम्स यांच्याकडून उत्तर अमेरिकेत 34 ते 40 रेखांशामधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची निघाले सनद 1606 साली मिळवली. कॅप्टन न्यूपोर्ट या धाडसी खलाशांच्या नेतृत्वाखाली 'सुसन कान्स्टन्ट' गॉडस्पीड व 'डिस्कव्हरी' या तीन नौका घेऊन 117 ब्रिटिश लोक अमेरिकेत वसाहत करण्यासाठी निघाले. 1607 मध्ये हे लोक चेसेपीक या आखातात थेऊन किनाऱ्या एका नदीच्या मुखाशी वसाहत करून राहिले. त्यांनी या जागेला आपल्या राजाच्या सन्मानीच 'जेम्स टाऊन' असे नाव दिले. ही वसाहत व्हर्जिनिया या नावानेच ओळखली जाते. हि वसाहत करताना या लोकांना अनेक संकटांना तोंड दयावे लागले. रोगराई, अन्नाचा तुटवडा, तेथील जमातीच्या लोकांचे हल्ले यामुळे अनेकजण मृत्युमुखी पडले. 117 पैकी केवळ 53 लोकच जिवंत राहिले.

याच काळात इंग्लंडहून काही मदत आली. कॅ. जॉन स्मिथ, विंगफिल्ड एडवर्ड, थॉमस गोटस या संचालकांनी धैर्याने सर्व संकटांना तोंड देत स्थिर जीवनास प्रारंभ केला.

2] मॅसेच्युसेटस

चार्लस पहिला याच्या कारकिर्दीत प्युरीटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा कराच त्रास झाला होता. त्यापैकी 102 प्युरीटन 'मे फ्लॉवर' जहाज घेऊन 1620 मध्ये अमेरिकेतील 'केपकॉड' बंदरापाशी येऊन पोहचले. त्यांनी राजाकडून वसाहत स्थापनण्याची सनद घेतली नव्हती अमेरिकन भूमीवर त्यांचा हक्क नव्हता. तेव्हा त्यांनी आपापसात विचारविनिमय करून नविन वसाहतीत शासनयंत्र स्थापन करण्याचा करार केला. हा करार मे फ्लॉवर कॉम्पॅक्ट या नावाने प्रसिद्ध आहे. केपकॉड प्रदेशालाच पुढे प्लायमाऊथ हे नाव रूढ झाले.

हळूहळू कॅटालकेके हजारो लोक प्लायमाऊथ येथे स्थायिक झाले. या ठिकाणी लोकांना खरे स्वातंत्र्य मिळाले. लोकशाहीचा पाया या वसाहतीत घातला गेला.

3] मेरीलँड

इ.स. 1632 मध्ये चेसपीक व डेलवेयर आखातच्या मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टीमोर (जॉर्ज कलव्हर्ट) याने मेरीलँड या वसाहतीची स्थापना केली. पहिल्या चार्लसने ही वसाहत सुरू करण्यात आली. व्यापाराकर्ता आलेल्या लोकांव्यतिरिक्त कॅथॉलिक पंथाच्या लोकांनाही या वसाहतीत स्थायिक होता आले. बाल्टीमोर हा या वसाहतीचा राज्यपाल होता व पुढे त्याच्याच घराण्याची सत्ता या वसाहतीवर राहिली. 1635 मध्ये या वसाहतीत प्रतिनिधिक विधिमंडळाची स्थापना केली. मध्य अमेरिकेतील या वसाहतीत व्यापार, उद्योग व शिक्षण इ. क्षेत्रांत अन्य वसाहतींप्रमाणे विकास होऊ शकला नाही.

4] न्यूयॉर्क

हॉलंडमधील डच खलाशी हडसनने व लॉंगन बेटाचा व हडसन नदीचा 1609 मध्ये शोध लावला. त्यानंतर

डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला. 1626 मध्ये पीटर मायन्यूटने (ॲमस्टरडॅम) शहर वसविले. परंतु डचांना या वसाहतीवर फार काळ वर्चस्व टिकवता आले नाही. इंग्रजांनी 1664 मध्ये ॲमस्टरडॅमवर स्वारी करून ही वसाहत डचांच्या ताब्यातून जिंकली व त्या शहरास व वसाहतीस न्यूयॉर्क हे नाव दिले.

5) डिलावेअर

स्वीडिश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात वसाहतीची स्थापना केली व त्या वसाहतीला 'न्यू स्वीडन' नाव देण्यात आले. पुढे त्या वसाहतीचा ताबा डचांनी घेतला. इंग्लंडच्या राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती. तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव करून तेथे आपले वर्चस्व मिळवले. इंग्रजांनी याचे नाव बदलून डिलावेअर वसाहत असे ठेवले.

6) कनेक्टीकट

इंग्लंडमधील प्युरीटनांनी अमेरिकेत न्यू इंग्लंड राज्यसंघात ज्या प्लीमाऊथ, मॅसॅच्युसेटस, न्यु हॅम्पशायर, ऱ्होड आयलंड, कनेक्टीकट व न्यू हेवन या सहा वसाहती स्थापन केल्या होत्या, त्यापैकी कनेक्टीकट ही एक होती. इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यानंतर 1662 मध्ये ही वसाहत स्वतंत्र.

7) न्यूजर्सी

डच लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती. इ.स. 1664 मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली. येथेही लोकशाही भक्कम करण्याचा प्रयत्न केला होता. चेसपीक व डेलावेअर आखाताच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली. कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

8) हॅम्पशायर

न्यू इंग्लंड संघातील 6 वसाहतीपैकी न्यू हॅम्पशायर एक. 1679 मध्ये न्यू संघाच्या विभक्तीनंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. ही वसाहत अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील टोकास होती. या वसाहतीवर मॅसॅच्युसेटसचा प्रभाव होता.

९) पेनसिल्व्हानिया

दुसऱ्या चार्ल्सने विल्यम पेनला या प्रांताची वैयक्तिक सनद दिली होती. तो क्वेकर पंथीय होता. त्याने 1682 मध्ये ही वसाहत स्थापन केली. पेन हा धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्करता व गुलामगिरी पद्धतीचा विरोधक होता. स्कॉटलंडमधील लोक मोठ्या प्रमाणात येथे जाऊन स्थायिक झाले.

१०) ऱ्होड आयलंड

'न्यू इंग्लंड' राज्यसंघात या वसाहतीचा सुरवातीला समावेश होता. 1685 मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला. रॉजर विल्यम हा बंडखोर धर्मसुधारक मॅसॅच्युसेटमध्ये होता. त्याच्या पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो ऱ्होड आयलंड वसाहतीत आला.

११) दक्षिण कॅरोलिना

इंग्लंडचे राष्ट्रीय धोरण स्पेनला शह देण्याचे होते. इ.स 1670 मध्ये दुसऱ्या चार्ल्सने लॉर्डस् शॅफ्टस् बरी आणि इतर आठ व्यक्तींना दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावर 31° ते 36° जागा मालकी हक्काने विकली होती. त्या ठिकाणी दक्षिण कॅरोलिना ही वसाहत निर्माण झाली. येथील जमीन सुपिक होती.

१२) उत्तर कॅरोलिना

व्हर्जिनियाला लागूनच ही वसाहत होती. सुरवातीला ती व्हर्जिनिया वसाहतीतच अंतर्गत होती परंतु 1729 मध्ये ती वेगळी झाली तेथे जमीनदारीची प्रथा होती व हे जमीनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन जगणारे होते. त्यामुळे येथे गुलामगिरीची प्रथा होती निग्रो गुलामांचे जीवन कष्टप्रद होते.

13) जॉर्जिया

जेम्स एडवर्ड ओगलथार्पने गरीब, कर्जबारी व मागासलेला लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने, 1732 मध्ये ही वसाहत सॅव्हना नदीच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीच्या जमीनीवर वसवली होती. राजा जॉर्जच्या स्मरणार्थ या वसाहतीत जॉर्जिया असे नाव देण्यात आले. या वसाहतीस सॅव्हना शहर विकास पावले होते. या वसाहतीच्या दक्षिणेला असलेला फ्लोरीडाचा प्रदेश स्पॅनिशांच्या ताब्यात होता.

9/10

Date 17-9-19
Page

Name- Devdas Ramchandra Zore
class - B.A III    Roll.No - 5687
subject - History Paper. no - 8 .

## * अमेरिकेचा इतिहास *

प्रश्न-2 अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती लिहा?

→ प्रस्तावना :-

अमेरिकेत वसाहत करण्याच्या दृष्टीने पहिल्यांदा मार्च 1584 मध्ये वॉल्टर रॅलेने एलिझाबेथ राणीकडून सनद मिळवून फिलीप अमेडास व आर्थर बार्लो या दोघांना उत्तर अमेरिकेत वसाहतीसाठी जागा शोधण्यासाठी पाठविले. तो 67 दिवसानंतर उत्तर कॅरोलिनाच्या तटाजवळील रोनाक बेटात गेले. रॅलेने राणीच्या सन्मानार्थ या भागाला व्हर्जिनिया नाव दिले होते.

① ब्रिटिशांची पहिली वसाहत व्हर्जिनिया :-

1584 साली वॉल्टर रॅलेचा अमेरिकेत वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला तरी त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गोष्टी ब्रिटिशांच्या लक्षात आल्या व हे काम एकट्या इसमाचे नाही याची जाणीव झाली. ब्रिटिश व्यापाऱ्यांनी लंडन व प्लीमाऊथ कंपन्या स्थापन केल्या. या कंपन्यांना पहिला जेम्स याच्याकडून उत्तर अमेरिकेत 34 ते 40 रेखांमधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद 1606 साली मिळाली. व्हर्जिनिया ही वसाहत करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले,

Date ______
Page ______

2) **मॅसॅच्युसेटस** :- चार्लस पहिला यांच्या कारकिर्दीत प्युरीटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा करावा त्रास झाला होता. त्यांपैकी 102 प्युरिटन मे फ्लॉवर जहाज घेऊन 1620 मध्ये अमेरिकेतील बंदरावर येऊन पोहोचले त्यांनी राजाकडून सनद घेतली नव्हती. त्यामुळे त्यांच्या अमेरिकन भूमीवर हक्क नव्हता. इंग्लंडच्या काही प्युरिटनांनी मॅसॅच्युसेटस कंपनीची स्थापना केली त्यांचा त्यांनी विकास केला या वसाहतीत 20 हजार इंग्रज स्थायिक झाले.

3) **मेरीलँड** :- इ.स. 1682 मध्ये पोटॅमॅक व डेलावेयर खाडीतील मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टीमोर यांनी मेरीलँड या वसाहतीची स्थापना केली. हि वसाहत स्थापण्यासाठी इंग्लंड सनद दिली होती म्हणून तिच्या राणीच्या गौरवार्थ तिच्या नावाने हि वसाहत सुरू करण्यात आली.

4) **न्यूयॉर्क** :- हॉलंडमधील डच खलाशी हडसनने मॅनहटन व लाँग आयलंड व हडसन नदीचा 1609 मध्ये शोध लावला त्यानंतर डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला. इंग्रजांनी 1664 मध्ये ॲमस्टरडॅमवर स्वारी करून हि वसाहत जिंकली व त्या वसाहतीला न्यूयॉर्क हे नाव दिले.

5) **डेलावेअर** :- स्वीडिश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डेलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली व त्या वसाहतीला न्यू स्वीडन हे नाव देण्यात आले. इंग्लंडच्या राजाने विल्यम पेन्न या वसाहतीची सनद दिली होती. तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव करून तेथे आपले वर्चस्व मिळविले.

6) **कनेक्टीकट** :- इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर 1662 मध्ये हि वसाहत स्वतंत्र झाली या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती येथे fundamental orders of Connecticut नावाची स्वतंत्र सनद स्थापन प्रतिनिधीक विधिमंडळाची निर्मिती केली होती. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात या वसाहतीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

7) **न्युजर्सी** :- डच लोकांनी न्युजर्सी वसाहत स्थापन केली होती इ. स. 1664 मध्ये इंग्लंडने हि वसाहत जिंकून घेतली येथे हि लोकशाही शासन प्रणाली होती विधिमंडळाने स्वतंत्र नागरिकांचे कायदे पास करून लोकशाहीचे अवलंबन करण्याचा प्रयत्न केला होता. कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

8) **न्यु हॅम्पशायर** :- न्यु इंग्लंड संबोधित सहा वसाहतीं पैकी न्यु हॅम्पशायर हि एक वसाहत आहे 1679 मध्ये न्यु इंग्लंड राज्याच्या विभाजनीकरणानंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. या वसाहतीवर मॅसेच्युसेट्सचा प्रभाव होता.

9) **पेनसिल्व्हानिया** :- दुसऱ्या चार्ल्स विल्यम पेन यांना 1682 मध्ये हि वसाहत स्थापन केली. स्कॉटिश व जर्मन लोकांच्या उद्योगी व कष्टाळू प्रवृत्तीमुळे या वसाहतीचा व्यापारीय विकास झाला होता या वसाहतीने स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान दिले होते

10) **ऱ्होड आयर्लंड** :- 1685 मध्ये सनद प्राप्त झाली वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला रॉजर विल्यम हा संस्थापक धर्मसुधारक होता. पुरोगामी विचारामुळे

त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो थोड
आयर्लंड वसाहतीत आला.

1) <u>दक्षिण कॅरोलिना</u> :- दक्षिणेकडील समुद्र किनाऱ्यावर उत्तर 36° अक्षांशामधील जागा मोकळी एकाकी होती. त्या ठिकाणी हि वसाहत स्थापन झाली होती. येथील जमीन सुपीक होती शेती व व्यापाराचा येथे विकास.

2) <u>उत्तर कॅरोलिना</u> :- व्हर्जिनियाशी लागून हि वसाहत होती. तेथे जमीनदारीची प्रथा होती व हे जमीनदार धनदांडगे होते व शेतकरी शोषक जमीनदार होते त्यामुळे येथे गुलामगिरी प्रथा होती. येथे सांस्कृतिक, आर्थिक विकास म्हणावा तितका झाला नाही.

3) <u>जॉर्जिया</u> :- जेम्स एडवर्ड ओगलथॉर्पने गरीब कर्जबाजारी व भोगाळलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने 1732 मध्ये हि वसाहत सव्हाना नदीच्या खोऱ्यात स्थापना. त्या भागाच्या जमिनीवर वसवली होती. राजा जॉर्जच्या स्मरणार्थ त्या वसाहतीस जॉर्जिया असे नाव देण्यात आले.

<u>मूल्यमापन</u> :- आज जागतिक राजकारणात सर्वात बलशाली सत्ता म्हणून अमेरिकेचे स्थान आहे. अमेरिकेच्या एकूण 13 वसाहती आहेत अमेरिकेतील या तेरा वसाहतीमध्ये कोणताही एकजिनसीपणा नव्हता किंवा सर्वांचे नेतृत्व एकसूत्री करून सर्वांचे सामायिक प्रशासन नसताना या देशाने औद्योगिक विज्ञान व तंत्रज्ञानात संशोधन, शिक्षण, कला सर्वच क्षेत्रात आश्चर्यजनक प्रगती केली आहे.

Roll No 5652 8/10

GoodLuck Page No.
Date 17/9/2019

प्र 2] अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती लिहा?

→ 1] ब्रिटिशांची पहिली वसाहत व्हर्जिनिया :-

1584 साली वाल्टर रॅलेचा अमेरिकेत वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी आला तरी त्यामुळे वसाहती करण्यातील अडचणी व गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले आहे. व हे काम एकट्या दुकट्याचे नाही याची जाणीव झाली त्यानंतर ब्रिटिश व्यापाऱ्यांना हे काम सामुदायिकरित्या व राज्यकर्त्यांच्या पाठिंब्याने करण्याचे ठरविले त्यांनी 'लंडन व प्लीमाऊथ कंपनी' अशा दोन कंपन्या स्थापन केल्या. या कंपन्यांनी पहिला जेम्स यांच्याकडून उत्तर अमेरिकेतील 34 ते 40 रेखांशांमधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद 1606 साली मिळवली कॅप्टन न्यूपोर्ट या धाडसी खलाशाच्या नेतृत्वाखाली 'सुसन कॉन्स्टन्ट, गॉडस्पीड' व 'डिस्कव्हरी' या तीन नौका घेऊन 120 लोक अमेरिकेत ब्रिटिश अमेरिकेत वसाहत स्थापन करण्यासाठी निघाले. 1607 मध्ये हे लोक चेसपीक या आखातातला घेऊन मिळणाऱ्या एक नदीच्या मुखाशी वसाहत करून राहिले.

2] मॅसॅच्युसेटस :-

चार्ल्स पहिला याच्या कारकिर्दीत प्युरिटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित धर्माच्या बराच त्रास आला होता त्यापैकी 102 प्युरिटन 'मे फ्लॉवर' जहाज घेऊन 1620 मध्ये अमेरिकेतील केपकॉड बंदरापाशी येवून पोहचले. त्यांनी राजाकडून वसाहत स्थापण्याची सनद घेतली नव्हती. अमेरिकन भूमीवर त्यांचा हक्क नव्हता. तेव्हा त्यांनी आपापसात विचारविनिमय करून नवीन वसाहती शासनयंत्रणा स्थापन करण्याचा करार केला. हा करार 'मे फ्लॉवर कॉम्पॅक्ट' या नावाने प्रसिद्ध आहे. केपकॉड प्रदेशाला पुढे 'प्लायमाऊथ' हे नाव रूढ झाले. धर्मछळाला कंटाळलेले हजारो लोक प्लायमाऊथ येथे येऊन स्थायिक झाले या ठिकाणी लोकांना खरे स्वातंत्र्य मिळाले. लोकशाहीच्या पायाचा वसाहतीत घातला गेला पुढे 1691 मध्ये 'प्लायमाऊथ' 'मॅसॅच्युसेटस' मध्ये विलीन झाली.

3] मेरीलँड :-

इ.स 1632 मध्ये चेसपीक व डेलावेयर आखातांच्या मधल्या भुभागास लॉर्ड बाल्टीमोर (जॉर्ज कल्व्हर्ट) याने 'मेरीलँड' या वसाहतीची स्थापना केली पहिल्या चार्ल्सने ही वसाहत स्थापण्याबद्दल सनद दिली होती म्हणून त्याच्या राणीच्या मेरीच्या तिच्या नावाने हि वसाहत सुरु करण्यात आली.

(15) ROYAL

GoodLuck Page No.
Date

व्यापाराकरिता आलेल्या लोकांसाठी रोमन कॅथॉलिक पंथाच्या लोकांनाही या वसाहतीत स्थायिक होता आले. बाल्टीमोर हा या वसाहतीचा राज्यपाल होता. पुढे त्याच्याच घराण्याची सत्ता या वसाहतीवर राहिली 1633 मध्ये या वसाहतीत प्रतिनिधिक विधिमंडळाची स्थापना केली. मध्य अमेरिकेत या वसाहती प्रमाणे विकास होऊ शकला नाही.

4) न्यूयॉर्क :-

हॉलंडमधील डच खलाशी हडसनने मॅनहॅटन बेटाचा व हडसन नदीच्या 1609 मध्ये शोध लावला त्या नंतर डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला 1626 मध्ये पीटर मायन्युटने (ॲमस्टरडॅम) शहर वसविले परंतु डचांना या वसाहतीवर फार काळ वर्चस्व टिकविता आले नाही. इंग्रजांनी 1664 मध्ये ॲमस्टरडॅमवर स्वारी करून ही वसाहत जिंकली.

5) डिलावेअर :-

स्वीडिश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली व त्या वसाहतीला न्यू स्वीडन हे नाव देण्यात आले. पुढे त्या वसाहतीचा ताबा डचांनी घेतला इंग्लंडच्या राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती, तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव करून त्यांना तेथे आपले वर्चस्व मिळविले. इंग्रजांनी त्या वसाहतीचे 'न्यू स्वीडन' हे नाव बदलून डिलावेअर हे नाव दिले.

6) कनेक्टिकट :-

इंग्लंडमधील प्युरिटनांनी अमेरिकेत 'न्यू इंग्लंड' राज्यसंघात ज्या मॅसॅच्युसेट्स, न्यू हॅम्पशायर, ऱ्होड आयलंड, कनेक्टिकट व न्यू हेवन या सहा वसाहती स्थापन केल्या होत्या त्यापैकीच कनेक्टिकट ही एक होती. इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर 1662 मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली त्या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती.

7) न्यूजर्सी :-

डच लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती. इ.स 1664 मध्ये इंग्रजांनी हि वसाहत जिंकून घेतली. येथे ही लोकशाही शासन प्रणाली होती येथील विधिमंडळाने स्वातंत्र्य नागरिकांचे कायदे पास करून लोकशाही भक्कम करण्याचा प्रयत्न केला होता. न्यूयॉर्क व डेलावेअर आखातांच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली. कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

ROYAL

GoodLuck Page No.
Date

8) न्यु हॅम्पशायर :-

न्यु इंग्लंड संघातील सहा वसाहती पैकी न्यु हॅम्पशायर ही एक वसाहत आहे 1679 मध्ये न्यु इंग्लंड संघाच्या विभक्ती करणोनंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला ही वसाहत अमेरिकेच्या पुर्व किनाऱ्यावरील उत्तरेच्या टोकास होती व वसाहतीवर मॅसेच्युसेटसच्या प्रभाव होता.

9) पेनसिल्व्हानिया :-

दुसऱ्या चार्लसने विल्यम पेनला या प्रांताची मालकी सनद दिली होती तो क्वेकर पंथीय होता याने 1680 मध्ये ही वसाहत स्थापन केली पेन हा धार्मिक स्वातंत्र्यावर पुरस्कर्ता व गुलामगिरी पद्धतीचा विरोधक होता स्कॉटलंडमधील लोक मोठ्या प्रमाणात येथे येऊन स्थायिक झाले होते स्कॉटलंड व जर्मन लोकांच्या उद्योगी व कष्टाळू प्रवृत्तीमुळे या वसाहतीचा सर्वांगीण विकास झाला होता.

10) ऱ्होड आयलंड :-

न्यु इंग्लंड राज्यसंघात या वसाहतीचा सुरुवातीला समावेश होता 1685 मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला रॉजर विल्यम हा बंडखोर धर्मसुधारक मॅसेच्युसेटमध्ये होता त्याच्या पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो ऱ्होड आयलंड वसाहतीत आला ठिकाणी त्याने धार्मिक स्वातंत्र्य, स्वातंत्र्य, समता, व लोकशाही रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे या ठिकाणी समाजाची निर्मिती केली व त्याची स्वातंत्र्य आंदोलनासाठी मदत झाली.

11) दक्षिण कॅरोलिना :-

इंग्लंडचे राष्ट्रीय धोरण स्पेनला शह देण्याचे होते इ.स. 1670 मध्ये दुसऱ्या चार्लसने लॉर्डस् शॉफ्टसबरी आणि इतर आठ व्यक्तींना दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावर 31° ते 36° अक्षांशामधील जागा मालकी हक्काने दिलेली होती त्या ठिकाणी दक्षिण कॅरोलिना ही वसाहत निर्माण झाली येथील जमीन सुपीक होती त्यामुळे शेती व व्यापाराच्या मध्ये विकास झाला भात व तंबाखूचे येथे मोठ्या प्रमाणात उत्पन्न निघत होते.

12) उत्तर कॅरोलिना :-

व्हर्जिनियाला लागूनच ही वसाहत होती सुरुवातीला ती व्हर्जिनिया वसाहतीचाच अंतर्भूत होती, परंतु 1729 मध्ये ती वेगळी झाली तेथे जमीनदारीची प्रथा होती.

RQY86

GoodLuck | Page No.
Date

(3) जेम्स जॉर्जिया :-

जेम्स एडवर्ड ओगलथार्पने गरीब, कर्जबाजारी व मागासलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने 1732 मध्ये ही वसाहत सॅव्हाना नदीच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीच्या जमीनिवर वसवली होती.

ROYAL

10

Page No. 1
Date: 17/9/19

Name - Yogita Yashwantrao Borchate
class - B.A III
Roll No - 5628
Subject - History Paper No-8

## अमेरिकेचा इतिहास

प्रश्न② अमेरिकेच्या 13 वसाहतींची माहिती लिहा ?

→ प्रस्तावना :-

अमेरिकेत वसाहत करण्याच्या दृष्टीने पहिल्यांदा मार्च १५८४ मध्ये वॉल्टर रॅलेने एलिझाबेथ राणीकडून सनद मिळवून फिलीप ॲमडास व आर्थर बार्लो या दोघांना उत्तर अमेरिकेत वसाहतीसाठी जागा शोधण्यासाठी पाठविले ते ६५ दिवसानंतर उत्तर कॅरोलिनाच्या तटाजवळील रोनॉक बेटात गेले रॅलेने राणीच्या सन्मानार्थ या भागाला 'व्हर्जिनिया' नाव दिले होते परंतु ही वसाहत फार काळ टिकू शकली नाही. अमेरिकेच्या 13 वसाहती पुढील प्रमाणे :-

① ब्रिटिशांची पहिली वसाहत व्हर्जिनिया :- १५८४ साली वाल्टर रॅलेचा अमेरिकेत वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला तरी त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले व हे काम एकट्या-दुकट्याचे नाही याची जाणीव झाली ब्रिटिश व्यापाऱ्यांनी 'लंडन' व 'प्लीमाऊथ' कंपन्या स्थापन केल्या या कंपन्यांनी पहिला जेम्स याच्याकडून उत्तर अमेरिकेत ३४ ते ४० रेखांमधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद १६०६ साली मिळविली. 'व्हर्जिनिया' ही वसाहत करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. 'जॉन रॉल्फ' या इंग्रजाने पोकोहोंटस या ताम्र जातीच्या प्रमुखाच्या मुलीशी लग्न केले व त्यांचेशी मैत्री केली. त्यांच्याकडून तंबाखूच्या लागवडीचे तंत्र अवगत करून घेतले, वृक्षतोड करून जमिनी लागवडीखाली आणल्या त्याच्या भरमसाट निर्यातीमुळे वसाहतकारांना फायदा झाला व त्यांची भरभराट होण्यास मदत झाली. 'व्हर्जिनिया' ही अमेरिकेच्या मूळ तेरा वसाहतींपैकी पहिली वसाहत होय पुढील दिडशे वर्षाच्या काळात म्हणजे १६०६ ते १७३३ या कालावधीत ब्रिटिशांनी एकूण १३ वसाहती स्थापन केल्या.

② मॅसॅच्युसेटस :-

चार्लस पहिला याच्या कारकिर्दीत प्युरीटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा बराच त्रास झाला होता. त्यापैकी १०२ प्युरीटन 'मे फ्लॉवर' जहाज घेऊन १६२० मध्ये अमेरिकेतील बंदरापाशी येऊन पोहोचले. त्यांनी राजाकडून सनद घेतली नव्हती त्यामुळे त्यांचा अमेरिकन भूमिवर हक्क नव्हता. दुसऱ्या काही प्युरीटन्सनी मॅसॅच्युसेटस बे कंपनी ची स्थापना केली. त्याचा त्यांनी विकास केला. या वसाहतीत २० हजार इंग्रज स्थायिक झाले. व्यापारबरोबरच येथे जहाजबांधणी, लाकूड सामान इ. व्यवसायही वाढले. काही अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली होती. १६३६ मध्ये या ठिकाणी जगप्रसिद्ध हॉर्वर्ड विद्यापीठ स्थापन झाले. शिक्षणात भरघटन घडून आली.

③ मेरीलँड :- इ.स. १६३२ मध्ये चेसपिक व डेलावेयर आखाताच्या मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टीमोर (जॉर्ज कल्वर्ट) याने 'मेरीलँड' या वसाहतीची स्थापना केली. ही वसाहत स्थापन्याबद्दल सनद दिली होती. म्हणुन तिच्या राणीच्या गौरवार्थ तिच्या नावाने ही वसाहत सुरु करण्यात आली. १६३५ मध्ये या वसाहतीत प्रातिनिधिक विधिमंडळाची स्थापना केली. या वसाहतीत व्यापार, उद्योग व शिक्षण इ. क्षेत्रांत अन्य वसाहतीप्रमाणे विकास होऊ लागला.

④ न्यूयॉर्क :-

हॉलंडमधील डच, खलाशी हडसनने मॅनहॅटन बेटाचा व हडसन नदीचा १६०९ मध्ये शोध लावला. त्यानंतर डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला. इंग्रजांनी १६६४ मध्ये 'ॲमस्टरडॅमवर' स्वारी करुन ही वसाहत जिंकली व त्या वसाहतीस 'न्यूयॉर्क' हे नाव दिले. या वसाहतीत विविध पंथाचे धर्माचे लोक स्थायिक झाले होते. त्यामुळे वसाहतीत विविधता आढळते. वसाहतीत शेती, व्यवसाय, पशुपालन यांचा विकास झाला. पुढील काळात येथे शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीही झाली.

⑤ डिलावेअर :-

स्वीडिश व्यापाऱ्यांनी १६४० मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली. व त्या वसाहतीला 'न्यू स्वीडन' हे नाव देण्यात आले. इंग्लंडच्या राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती. तेव्हा इंग्रजांनी डचांचा पराभव

करून तेथे आपले वर्चस्व मिळविले. वसाहतीचे 'न्यू स्वीडन' हे नाव बदलून डिलावेअर हे नाव दिले पुढे ती १७७६ मध्ये स्वतंत्र झाली.

⑥ कनेक्टीकट :-

इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर १६६२ मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली. या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती येथे fundamental orders of connecticut नावाची स्वतंत्र घटना स्थापन प्रातिनिधिक विधिमंडळाची निर्मिती केली होती. अमेरिकन स्वातंत्र्य युद्धात या वसाहतीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

⑦ न्यूजर्सी :-

'डच' लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती इ.स १६६४ मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली. येथेही लोकशाही शासनप्रणाली होती अमेरिकन विधिमंडळाने स्वतंत्र 'नागरिकांचे कायदे' पास करून लोकशाही भक्कम करण्याचा प्रयत्न केला होता चेसपिक व डेलावेअर आखाताच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

⑧ न्यू हॅमशायर :- न्यु इंग्लंड संघातील सहा वसाहतीपैकी न्यू हॅमशायर ही एक वसाहत आहे १६७९ मध्ये न्यू इंग्लंड संघाच्या विभक्तीकरणानंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला. या वसाहतीवर मॅसेच्युसेट्सचा प्रभाव होता.

⑨ पेनसिल्व्हानिया :-

दुसऱ्या चार्लस विल्यम पेन याने १६८२ मध्ये ही वसाहत स्थापन केली स्कॉटलंड व जर्मन लोकांच्या उद्योगी व कष्टाळू प्रवृत्तीमुळे या वसाहतीचा चांगलाच विकास झाला होता अमेरिका आर्थिक विकासात या वसाहतीला महत्त्वपुर्ण स्थान आहे शिक्षण, व्यापार, संशोधन यामुळे हे आत्याधुनिक बनले होते या वसाहतीने स्वातंत्र्यलढ्यासाठी मोठे योगदान दिले आहे.

⑩ ऱ्होड आयलंड :-

१६६५ मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतीचा दर्जा प्राप्त झाला 'रॉजर विल्यम' हा बंडखोर धर्मसुधारक होता.

पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो 'होड' आयलंड वसाहतीत आला. या ठिकाणी नवसमाजाची निर्मिती झाली व त्याची स्वातंत्र्य आंदोलनसाठी मदत झाली.

⑪ दक्षिण कॅरोलिना :-

दक्षिणेकडील समुद्र किनाऱ्यावर ३७° ते ३६° अक्षांशामधील जागा मालकी हक्काने विकली होती. त्या ठिकाणी ही वसाहत स्थापन झाली होती. येथील जमिन सुपीक होती. शेती व व्यापाराचा येथे विकास झाला. भात, तंबाखूचे उत्पन्न निघत होते. दक्षिणेकडील वसाहतीत दक्षिण कॅरोलिना आघाडीवर होते.

⑫ उत्तर कॅरोलिना :-

'व्हर्जिनियाला' लागून ही वसाहत होती. तेथे जमिनदारी प्रथा होती व हे जमीनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन जगणारे होते. त्यामुळे येथे गुलामगिरी प्रथा होती. येथे सांस्कृतिक, आर्थिक विकास म्हणावा तितका झाला नाही. सामान्य जनता, कामगार दुर्लक्षित राहिली होती. येथे लोकशाहीचा विकास झाला नव्हता.

⑬ जॉर्जिया :-

जेम्स एडवर्ड ओगलथार्पने गरीब, कर्जबाजारी व मग्न असलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टीने १७३२ मध्ये ही वसाहत सव्हाना नदीच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीवर जमिनीवर वसवली होती. 'राजा जॉर्जच्या' स्मरणार्थ या वसाहतीस जॉर्जिया असे नाव देण्यात आले. या वसाहतीच्या दक्षिणेला असलेला फ्लोरीडाचा प्रदेश स्पॅनिशांच्या ताब्यात होता. त्यांच्या वर्चस्वाला आळा घालण्यासाठी इंग्रजांचे या वसाहतीकडे लक्ष होते.

मूल्यमापन :-

आज जागतिक राजकारणात सर्वात बलशाही सत्ता म्हणून अमेरिकेचे स्थान आहे. अमेरिकेच्या एकूण 13 वसाहती आहेत. अमेरिकेतील या तेरा वसाहतीमध्ये अगदी एकसंघपणा नव्हता किंवा सर्वांचे नेतृत्व एकमुखी नव्हते. सर्वांचे संघीक प्रशासन नव्हते. या देशाने शेती, उद्योगधंदे, विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधन, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रांत आश्चर्यजनक प्रगती केलेली आहे.

Name:- Shubhangi Uttam Jong Class - B.A III
Sub- History [Paper No- 8]
Roll No:- 5643

17-4-19

9/10

# अमेरिकेचा इतिहास

प्र 2] अमेरिकेच्या 13 वसाहतीची माहिती लिहा.

## प्रस्तावना:

अमेरिकेत वसाहत करण्याच्या दृष्टीने पहिल्यांदा मार्च 1584 मध्ये वॉल्टर रॅलेने एलिझाबेथ राणीकडून सनद मिळवून फिलीप ॲमेडास व ऑर्थर वार्लो या दोघांना उत्तर अमेरिकेत वसाहतीसाठी जागा शोधण्यासाठी पाठविले ते 67 दिवसानंतर उत्तर कॅरोलिनाच्या तटाजवळील रोनोक बेटात गेले रॅलेने राणीच्या सन्मानार्थ या भागाला 'व्हर्जिनिया' नाव दिले होते. परंतु ही वसाहत फार काळ टिकू शकली नाही. 'अमेरिकेच्या 13 वसाहती पुढीलप्रमाणे

## ब्रिटिशांची पहिली वसाहती व्हर्जिनिया :-

1584 साली वाल्टर रॅलेच्या अमेरिकेत वसाहत करण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाला तरी, त्यामुळे वसाहत करण्यातील अडचणी व त्यातील गांभीर्य ब्रिटिशांच्या लक्षात आले व हे काम एकट्या दुकट्याचे नाही याची जाणीव झाली. ब्रिटिश व्यापाऱ्यांनी 'लंडन' व 'प्लीमाऊथ' कंपन्या स्थापन केल्या या कंपन्यांनी पहिला जेम्स याच्याकडून उत्तर अमेरिकेत 34 ते 40 रेखांमधील प्रदेशात वसाहत स्थापन करण्याची सनद 1606 साली मिळवली 'व्हर्जिनिया' ही वसाहत करताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले 'जॉन रॉल्फ' या इंग्रजाने पोकाहॉटास या ताम्र जातीच्या प्रमुखाच्या मुलीशी लग्न केले व त्यांचीशी मैत्री केली. त्यांच्याकडून तंबाखूच्या लागवडीचे तंत्र अवगत करून घेतले, वृक्षतोड करून जमिनी लागवडीखाली आणल्या. त्याच्या भरमसाट होण्यास मदत झाली 'व्हर्जिनिया' ही अमेरिकेत मूळ तेरा वसाहतीपैकी पहिली वसाहत होय. पुढील दिडशेच्या काळात म्हणजे 1606 ते 1733 या कालावधीत ब्रिटिशांची एकूण 133 वसाहती स्थापन केल्या

② मॅसॅच्युसेटस :-

चार्लस पहिला याच्या कारकिर्दीत प्युरीटन पंथाच्या अनुयायांना प्रस्थापित चर्चचा बराच त्रास झाला होता. त्यापैकी ७०२ प्युरीटन 'मे फ्लॉवर' जहाज घेऊन 167 मध्ये अमेरिकेतील बंदर पाशी येऊन पोहोचले. त्यांनी राजाकडून सनद घेतली नव्हती त्यामुळे त्यांचा अमेरिकन भूमीवर हक्क नव्हता दुसऱ्या काही प्युरीटन्सनी मॅसॅच्युसेटस चे कंपनीची स्थापना केली. त्याचा त्यांनी विकास केला या वसाहतींत २० हजार इंग्रज स्थायिक झाले व्यापाराबरोबरच येथे जहाजबांधणी, लाकूड सामान इ. व्यवसायही वाढले

③ मेरीलँड

इ.स १६३२ मध्ये चेसपिक व डेलावेयर आखाना याने 'मेरीलँड' च्या मधल्या भूभागात लॉर्ड बाल्टीमोर याने ' मेरीलँड ' च्या वसाहतीची स्थापना केली ही वसाहत स्थापल्याबद्दल सनद दिली होती म्हणून तिच्या राणीच्या गौरवार्थ तिच्या नावाने ही वसाहत सुरु करण्यात आली. 1635 मध्ये या वसाहतीत प्रतिनिधी क विधीमंडळाची स्थापना केली.

④ न्यूयॉर्क

हॉलंडमधील डच खलाशी हडसनने मॅनहॅटन व लॉगन बेटाचा व हडसन नदीचा 1609 मध्ये शोध लावला त्यानंतर डचांनी त्या ठिकाणी वसाहतीस प्रारंभ केला. इंग्रजांनी 1664 मध्ये 'ॲमस्टरडॅमवर' स्वारी करून ही वसाहत जिंकली व त्यास वसाहतीस 'न्यूयॉर्क' हे नाव दिले. वसाहतीत शेती, व्यवसाय, पशुपालन यांचा विकास झाला पुढील काळात येथे शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीही झाली.

⑤ डिलावेअर :-

स्वीडिश व्यापाऱ्यांनी 1640 मध्ये डिलावेअर नदीच्या परिसरात या वसाहतीची स्थापना केली व त्या वसाहतीला 'न्यू स्वीडन' हे नाव देण्यात आले इंग्लंडच्या राजाने विल्यम पेनला या वसाहतीची सनद दिली होती तेव्हा इंग्रजांनी त्यांचा पराभव करून तेथे आपले वर्चस्व मिळविले वसाहतीचे 'न्यू स्वीडन' हे नाव बदलून डिलावेअर हे नाव दिले पुढे ती 1776 मध्ये झाली.

⑥ कनेक्टीकट :-

इंग्लंडच्या राजाची सनद मिळाल्यावर 1662 मध्ये ही वसाहत स्वतंत्र झाली या वसाहतीत लोकशाही प्रशासन व्यवस्था होती. येथे Fundamental orders of connecticut नावाची स्वतंत्र घटना स्थापना प्रातिनिधिक विधिमंडळाची निर्मिती केली होती.

⑦ न्यूजर्सी

'डच' लोकांनी न्यूजर्सी वसाहत स्थापन केली होती इ.स 1664 मध्ये इंग्रजांनी ही वसाहत जिंकून घेतली येथेही लोकशाही शासनप्रणाली होती अमेरिकन विधिमंडळाने स्वतंत्र नागरिकांचे कायदे पास करून लोकशाही भक्कम करण्याचा प्रयत्न केला होता चेसपीक व डेलावेअर आखातच्या परिसरातच ही वसाहत विकास पावली कोलंबिया विद्यापीठ या वसाहतीतच आहे.

⑧ न्यू हॅम्पशायर :-

न्यू इंग्लंड संघातील सहा वसाहतीपैकी न्यू हॅम्पशायर ही एक वसाहत आहे 1679 मध्ये न्यू इंग्लंड संघाच्या विभक्तीकरणानंतर या वसाहतीस स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला या वसाहतीवर मॅसच्युसेटचा प्रभाव होता.

⑨ पेनसिल्व्हानिया

दुसऱ्या चार्लस विल्यम पेन याने 1682 मध्ये ही वसाहत स्थापन केली स्कॉटलँड व जर्मन लोकांच्या उद्योगी व कष्टाळू प्रवृत्तीमुळे या वसाहतींचा चांगलाच विकास झाला होता अमेरिकेच्या आर्थिक विकासात या वसाहतीला महत्त्वपूर्ण स्थान आहे शिक्षण, व्यापार, संशोधन यामुळे हे अत्याधुनिक बनले होते या वसाहतीने स्वातंत्र्यलढ्यासाठी मोठे योगदान दिले आहे.

⑩ ऱ्होड आयलँड

1685 मध्ये सनद प्राप्तीनंतर तिला वसाहतींचा दर्जा प्राप्त झाला रॉजर विल्यम हा बंडखोर धर्मसुधारक होता पुरोगामी विचारामुळे त्यास तेथून हद्दपार व्हावे लागले म्हणून तो ऱ्होड आयलँड वसाहतीत आला या ठिकाणी नवसमाजाची निर्मिती झाली व त्यांची स्वातंत्र्य आंदोलनासाठी मदत झाली.

⑪ दक्षिण कॅरोलिना

दक्षिणेकडील समुद्र किनाऱ्यावर 34 ते 36 अक्षांशामधील जागा मालकी हक्काने विकली होती त्या ठिकाणी ही वसाहत स्थापन झाली होती येथील जमिन सुपिक होती

⑫ उत्तर कॅरोलिना :- 'व्हर्जिनियाला' लागून ही वसाहत होती तेथे जमिनदारीची प्रथा होती व हे जमीनदार प्रतिगामी वृत्तीचे व विलासी जीवन जगणारे होते त्यामुळे येथे गुलामगिरी प्रथा होती.

⑬ जॉर्जिया :- जेम्स एडवर्ड ओगलथार्पने गरीब, कर्जबाजारी व मागासलेल्या लोकांना आश्रय देण्याच्या दृष्टिने 1732 मध्ये ही वसाहत सॅव्हाना नदीच्या खोऱ्यात स्वतःच्या मालकीवर जमिनीवर बसवली.

अशा प्रकारे अमेरिकेच्या 13 वसाहती स्पष्ट करु शकतो.